जा.क्र.कबचौउमवि/०५/संलग्नता/१४४ /२०२३

दि. १०/०५/२०२३

## अत्यंत महत्वाचे परिपत्रक

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत,
सर्व कला, वाणिज्य व विज्ञान, विधी व समाजकार्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना.....

विषय :- अनुदानित/विनाअनुदानित पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या भाग-१ करीता अध्यापन करण्यासाठी महाविद्यालयात कमीत कमी ०२ किंवा ५० % शिक्षकांची ४१५(१) नुसार नियुक्ती करणे बाबत..

संदर्भ :- ०१) मा. विद्या परिषद ठराव क्र.वि.प.ए-४८/२०२३, दि. ०६/०५/२०२३
०२) मा.व्यवस्थापन परिषद ठराव क्र. व्य.प.ए-१०६/२०२३, दि. ०८/०५/२०२३

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भिय ठराव क्र. १ व २ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य महाविद्यालयांमध्ये अनुदानित / विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एल.एल.एम व एम.एस.डब्ल्यू या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अध्यापनासाठी प्रत्येक विषयाकरीता परिनियम ४१५(१) नुसार कमीत कमी ०२ शिक्षकांची नियुक्ती किंवा एकूण मान्यतेच्या ५०% पदे महाविद्यालयाने नियुक्त करणे बंधनकारक आहे.

वरील बाब तसेच मा. विद्या परिषद व मा.व्यवस्थापन परिषद यांचे ठराव विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित या पदव्युत्तर वर्गांसाठी वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षकांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. सदर शिक्षकांची नियुक्ती न केल्यास महाविद्यालयास पदव्युत्तर वर्गाच्या कुठल्याही विषयांना विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

कृपया वरील ठरावाची नोंद घ्यावी व सदर ठरावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी विद्यापीठ परिनियम ४१५(१) नुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शिक्षक नियुक्ती संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी व त्याबाबतचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास दि. ३० जून २०२३ पर्यत सादर करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

**प्रत माहितीसाठी :-**

०१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०४) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव
०५) मा.प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव
०६) उपकुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, कबचौउमवि, जळगाव
०७) सहा.कुलसचिव, प्रवेश व पात्रता विभाग, कबचौउमवि, जळगाव